# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६१०१
२०२ ५३१६
२८३ ५२१७
फॅक्स : २०२ ९९६०
एसटीडी : ०२२
तार : पाणी मंडळ, मुंबई

जा.क्र.मजीप्रा/मस/तांशा-१/५५०/ 1613 दिनांक : २५ मे, २००१

**परिपत्रक क्र. :- ७२**

**विषय** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून थेट ग्राहकांपर्यंत पाणी पुरवठा करण्यात येणा-या ठिकाणच्या पाणी पुरवठा योजनांबाबत घ्यावयाची खबरदारी व अपेक्षित सुधारणा.

राज्यातील २४ ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून थेट ग्राहकांपर्यंत पाणी पुरवठा करण्यात येतो व पाणी देयकांची वसुलीही करण्यात येते. सदर पाणी पुरवठा योजनांचा सर्वसाधारणपणे आढावा घेण्यात आला असता असे निदर्शनास येते की, या ठिकाणी थोडीशी खबरदारी घेतल्यास पाणी पुरवठ्याच्या देयकांच्या वसुलीमध्ये लक्षणीय वाढ होऊ शकते. विशेषतः ही बाब माथेरान पाणी पुरवठा योजनेबाबत प्रकर्षाने निदर्शनास आलेली आहे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) **<u>मागील थकबाकी असताना नवीन नळ जोडणी देणेबाबत :-</u>**

एखादया ग्राहकाकडे पूर्वीची नळ जोडणी असून त्या जोडणीची पाणी देयके अदा न केल्याने सदर ग्राहकाकडे थकबाकी राहते. या परिस्थितीत ग्राहक थकबाकी भरावी लागू नये म्हणून नवीन नळ जोडणीची मागणी करतो व अशी नवीन नळ जोडणी प्राधिकरणाकडून मंजूर करण्यात येते. ही बाब अतिशय आक्षेपार्ह आहे. या कार्यपद्धतीमुळे बराचसा महसूल वसूल होत नाही. वस्तुतः एखादया ग्राहकाकडे पूर्वीची नळ जोडणी असून त्या ठिकाणी पुन्हा नवीन नळ जोडणीची मागणी आल्यास सदर ठिकाणी/ठिकाणच्या ग्राहकास नवीन नळ जोडणी मंजूर करण्यापूर्वी पूर्वीची थकबाकी पूर्णतः वसूल करणे आवश्यक आहे. तथापि, याबाबत योग्य ती दखल घेतली जात नाही.

या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, एखादया ठिकाणी पूर्वीची नळ जोडणी असून त्यापोटी जर थकबाकी प्रलंबित असेल तर थकबाकीची रक्कम पूर्णतः वसूल झाल्याशिवाय सदर ठिकाणी ग्राहकास नवीन नळ जोडणी मंजूर करण्यात येऊ नये. अशी प्रकरणे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) **<u>पाण्याच्या दरामध्ये वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा व त्याची अंमलबजावणी:-</u>**

प्राधिकरणाकडून सुधारित करण्यात येणारे पाण्याचे दर त्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून अंमलात येतात. तथापि, याबाबत असे निदर्शनास आले आहे की, सदर दरवाढीचे परिपत्रक ज्या दिवशी क्षेत्रीय कार्यालयास मिळते त्या दिवसापासून वाढीव दराने देयकांची आकारणी करण्यात येते. ही बाब प्राधिकरणाच्या धोरणाशी पूर्णतः विसंगत आहे. त्यामुळे वाढीव दर ज्या दिनांकापासून अंमलात येणार आहेत असे परिपत्रकामध्ये नमूद केलेले आहे त्या दिनांकापासून त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

३) **<u>सुरुवातीस घरगुती नळ जोडणी घेणे व कालांतराने त्या ठिकाणी व्यवसाय (लॉजिंग बोर्डींग इत्यादी) सुरु करणे, मात्र घरगुती नळ जोडणीचे रुपांतरण बिगर घरगुती जोडणीमध्ये न करणे :-</u>**

आपल्या क्षेत्रातील नळ जोडणींचा आढावा घेवून अशी प्रकरणे आढळल्यास प्राधान्याने कार्यवाही करावी. असे करत असताना पूर्वलक्षी प्रभावाने बिगर घरगुती दराने आकारणी व वसुलीची कार्यवाही होईल असे पहावे.

४) **<u>व्यावसायीक गाळ्यांना घरगुती दराने पाण्याच्या देयकाची आकारणी न करणे:-</u>**

व्यावसायिक गाळ्यांना घरगुती दराने नळ जोडणी दिलेली असल्यास सदर नळ जोडणी पूर्वलक्षी प्रभावाने बिगर घरगुती स्वरुपात रुपांतरित होईल याची दक्षता घ्यावी.

५) **<u>हॉटेल्स, लॉजिंग बोर्डींग यांना होणा-या पाणी पुरवठ्याची आकारणी:-</u>**

हॉटेल्स, लॉजिंग बोर्डींग अशा ठिकाणी देण्यात आलेल्या नळ जोडण्यांच्या ठिकाणची बहुतांश मीटर्स नादुरुस्त दर्शविण्यात येवून सरासरी तत्वावर पाण्याची आकारणी करण्यात येते. तर काही ठिकाणी त्यांना घरगुती दराने पाण्याची देयके अदा करण्यात येतात ही बाब आक्षेपार्ह आहे याची नोंद घ्यावी.

...२...

ज्या ठिकाणी बिगर घरगुती नळ जोडणी देण्यात आलेली आहे त्या ठिकाणची माहिती खालील तपशीलानुसार प्रत्येक महिन्यास या कार्यालयास सादर करावी.

प्रपत्र -१

| अ.क्र | ग्राहकाचे नांव | नळ जोडणी क्रमांक | व्यवसायाचे स्वरुप | मीटर सुस्थितीत आहे किंवा कसे. नसल्यास कधीपासून | प्रलंबित थकबाकी व केव्हापासून | सरासरी मासिक देयकाची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

शे-याच्या रकान्यामध्ये संबंधित महिन्यात वसूल करण्यात आलेल्या रकमेचा तपशील दयावा.

६) **पाण्याची देयके ग्राहकांना देतेवेळी विचारात घ्यावयाची क्रमवारी :-**

ज्या ग्राहकांची पाण्याची देयके जास्ती रकमेची आहेत त्यांच्या देयकांचे वाटप प्राधान्याने होणे आवश्यक आहे याची नोंद घेण्यात यावी.

७) **ग्राहकांकडे असणारी थकबाकी :-**

ज्या ग्राहकांकडे रु.१०,००० पेक्षा जास्तीची थकबाकी प्रलंबित आहे त्या ग्राहकांकडील थकबाकी वसुलीस प्राधान्य दयावे. सदर ठिकाणची थकबाकी वसूल करण्यासाठी जोडणी तोडण्यासारख्या कारवाईचाही अवलंब करण्यात यावा. या मुद्यांच्या अनुषंगाने खालील तपशीलानुसार माहिती प्रत्येक महिन्यांत सादर करावी.

प्रपत्र-२

| अ क्र | ग्राहकाचे नांव | नळ जोडणी क्रमांक | प्रलंबित थकबाकी व केव्हापासून | | | मीटर सुस्थितीत नसल्यास कधीपासून | या महिन्यात करण्यात आलेली वसुली | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पाणी पट्टी | विलंब आकार | एकूण | | | |

८) **पाण्याची तूट :-**

प्रत्यक्षात उचलण्यात येणारे पाणी, वितरित होणारे पाणी व पाण्याची आकारणी याबाबत आढावा घेता असे निदर्शनास येत आहे की, पाण्याच्या देयकांचे वेळच्यावेळी वाटप न झाल्याने ब-याच ठिकाणी महसूलाचे उत्पन्न बुडत आहे. तसेच तूटीचे प्रमाणही फार मोठया प्रमाणात आहे.(बदलापूर पा.पु.योजना) या अनुषंगाने निर्देशित करण्यात येते की, वसुलीबाबत व देयकांच्या वाटपाबाबत निश्चित असे धोरण अवलंबण्यात यावे व महसूल वाढीसाठी प्रयत्न करण्यात यावेत.

ज्या ठिकाणी पाण्याचा व्यय १५% पेक्षा जास्त आहे त्या ठिकाणी विशेष गट स्थापन करुन तूटीचे प्रमाण कमी करण्याबाबत प्रयत्न करावेत व याबाबतचा आढावा या कार्यालयास सादर करावा तसेच सध्याअसणा-या तूटीची माहिती खालील प्रपत्रानुसार सादर करावी.

| उचलण्यात येणारे पाणी | पाण्याची आकारणी | तूटीचे प्रमाण |
|---|---|---|

सारांशाने क्षेत्रीय अधिका-यांनी पाणीपट्टी वसुली व तूटीचे प्रमाण कमी करण्याबाबत खबरदारी घेतल्यास महसुलात बरीचशी वाढ होऊ शकते याची नोंद घेवून उपरोक्त माहिती प्रपत्रानुसार प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत या कार्यालयास प्राप्त होईल अशा पध्दतीने सादर करावी.

प्रस्तुत सूचनांचे सनियंत्रण मुख्य अभियंता यांनी वैयक्तिक लक्ष देवून त्यांचे स्तरावर करावे. जेणेकरुन, अ.अ. व का.अ. यांचेकडून योग्य अंमलबजावणी होईल. या प्रकरणी दुर्लक्ष झाल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(सुरेश माळवी)
सदस्य सचिव

प्रत माहितीसाठी,
प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव(तांत्रिक),म.जी.प्रा.,मुंबई
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
सर्व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.
अधीक्षक अभियंता,म.जी.प्रा.मंडळ,
कार्यकारी अभियंता,म.जी.प्रा.बांधकाम विभाग,